RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर    वर्ष ३४ वे    अंक १३४ वा    बुधवार, दिनांक १३ ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक)    पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26    पृष्ठे – ६    मो:९४२२४७२५०२    किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८


# भारत–अमेरिका व्यापार तणाव मिटणार?

## पुढील महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांची भेट घेणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी संबंधांमध्ये तणाव वाढत असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील महिन्यात अमेरिकेला भेट देण्याची शक्यता आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेसाठी अमेरिकेला जाणार असून, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत बैठक आयोजित करण्याची तयारी सुरू आहे. या भेटीचा मुख्य उद्देश दोन्ही देशांमधील व्यापारी मतभेद दूर करणे हा असेल.**



ट्रम्प यांच्या व्यतिरिक्त, पंतप्रधान मोदी युक्रेनचे अध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्की यांच्यासह इतर देशांच्या नेत्यांशीही उच्चस्तरीय बैठक घेऊ शकतात, अशी माहिती सूत्रांनी दिली. णछत्रक्ष- शिखर परिषद सप्टेंबरमध्ये न्यूयॉर्क येथे होणार असून २३ सप्टेंबरपासून जागतिक नेते अमेरिकेत पोहोचण्यास सुरुवात करतील. जर ही बैठक झाली, तर फेब्रुवारीमध्ये झालेल्या भेटीनंतर सात महिन्यांत मोदी आणि ट्रम्प यांची ही दुसरी बैठक ठरेल.

मिळालेल्या माहितीनुसार, अध्यक्ष ट्रम्प देखील पंतप्रधान मोदींच्या भेटीसाठी उत्सुक आहेत. जून महिन्यात जेव्हा पंतप्रधान मोदी जी ७ परिषदेसाठी कॅनडामध्ये होते, तेव्हा ट्रम्प यांनी त्यांना वॉशिंग्टनला भेट देण्याचे निमंत्रण दिले होते. मात्र, त्यावेळी अमेरिकेत असलेले पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्यासोबत बैठक घडवून आणण्याचा प्रयत्न ट्रम्प करतील, या शक्यतेने मोदींनी सावध भूमिका घेत ते निमंत्रण नाकारले होते. जर पुढील महिन्यातील ही भेट यशस्वी ठरली, तर ऑक्टोबरमध्ये भारतात होणाऱ्या 'क्वाड' परिषदेसाठी पंतप्रधान मोदी स्वतः ट्रम्प यांना आमंत्रित करतील. 'क्वाड' संघटनेत भारत, अमेरिकेसह ऑस्ट्रेलिया आणि जपान हे सदस्य देश आहेत.

ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात पंतप्रधान मोदी आणि त्यांच्यात एक जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. मात्र, ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात जकात शुल्काबाबतच्या त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे या मैत्रीला तडा गेला आहे. असे असले तरी, ट्रम्प यांनी अनेकदा मोदींचा उल्लेख 'मित्र' असा केला आहे.

मोदी–ट्रम्प भेटीची ही शक्यता येत्या काही आठवड्यांतील अनेक घटकांवर अवलंबून आहे. यातील पहिला आणि सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भारत–अमेरिका द्विपक्षीय व्यापार करारावर सविस्तर चर्चा करणे. भारताने कृषी आणि दुग्धजन्य उत्पादनांची बाजारपेठ अमेरिकेसाठी खुली करण्यास दाखवलेल्या अनिच्छेमुळे हा करार अडखळला आहे. यातच ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के जकात शुल्क लादल्याने आणि रशियन तेलाच्या खरेदीमुळे अतिरिक्त २५ टक्के कर आकारल्याने संबंधी अधिकच चिघळले. भारतीय उत्पादनांवर एकूण ५० टक्के शुल्क लागू झाले आहे. यापैकी निम्मे शुल्क ७ ऑगस्टपासून लागू झाले असून, उर्वरित शुल्क २७ ऑगस्टपासून लागू होणार आहे. या अंतिम मुदतीपूर्वी दोन्ही देश व्यापार करारासाठी वेगाने वाटाघाटी करत आहेत.

भारताने रशियाकडून केलेली तेल खरेदी हा दोन्ही देशांमधील एक मोठा वादाचा मुद्दा बनला आहे. रशियाला मिळणारा हा महसूल युक्रेनमधील युद्धासाठी वापरला जात असल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे. ट्रम्प सातत्याने भारतावर रशियन तेल खरेदीवरून टीका करत असून, आयातीत कपात करण्यासाठी भारतावर दबाव टाकत आहेत. मात्र, भारताने अमेरिकेच्या या टीकेला दुटप्पीपणाचा आरोप करत जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

# काश्मीरमधील उरी येथे एक जवान शहीद



**काश्मीर/वृत्तसंस्था** : बुधवारी सकाळी उत्तर काश्मीरमधील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ दहशतवाद्यांचा घुसखोरीचा प्रयत्न सुरक्षा दलांनी उधळून लावला. या कारवाईदरम्यान एक जवान शहीद झाला. सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसरात शोध मोहीम सुरू केली आहे. गेल्या १३ दिवसांत दहशतवाद्यांशी लष्कराची ही तिसरी चकमक आहे.

यापूर्वी १० ऑगस्ट रोजी किश्तवाडच्या दुल भागात दहशतवाद्यांचा समावेश असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोध मोहीम सुरू केली होती. यादरम्यान दहशतवाद्यांनी सैन्यावर गोळीबार केला होता. येथेही शोध मोहीम सुरू आहे.

दहशतवाद्यांच्या शोधात १ ऑगस्टपासून कुलगामच्या अखल जंगलात शोध मोहीम सुरू आहे. येथे २ सैनिक शहीद झाले आहेत, तर ९ सैनिक जखमी झाले आहेत. दोन दहशतवादीही मारले गेले आहेत.

२ ऑगस्ट रोजी सकाळी सुरक्षा दलांनी पुलवामा येथील दहशतवादी हरिस नझीर डार याला ठार मारले. तो सी–श्रेणीचा दहशतवादी होता. पहलगाम हल्ल्यानंतर २६ एप्रिल रोजी गुप्तचर संस्थांनी ज्या १४ स्थानिक दहशतवाद्यांची नावे जाहीर केली होती, त्यांच्या यादीत हरिसचा समावेश होता.

एका अधिकाऱ्याने सांगितले होते की, परिसरात दहशतवादी कारवायांची गुप्त माहिती मिळाल्यानंतर १ ऑगस्ट रोजी संध्याकाळी शोध मोहीम सुरू करण्यात आली होती. यादरम्यान दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला.

यानंतर चकमक सुरू झाली. जंगलात किती दहशतवादी लपले आहेत हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या स्वरविलास संगीत दरबार कार्यक्रमाची जय्यत तयारी

## रसिकांनी रसास्वाद घ्यावा : स्वागताध्यक्ष दिलीपराव देशमुख यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर येथील आवर्तन, अष्टविनायक प्रतिष्ठान व मांजरा परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत केलेल्या लोकनेते विलासराव देशमुख यांना समर्पित स्वरविलास संगीत दरबार यामध्ये किराणा घराण्याचे जगविख्यात गायक पंडीत जयतीर्थ मेवुंडी यांचे गायन १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता दयानंद सभागृहात होणार असून त्यांना तबला संगत श्री. महेशराज साळुंके, पुणे व संवादिनी साथ श्री. स्वरूप दिवाण, कोल्हापूर हे करणार आहेत. यावर्षी स्वरविलास कार्यक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे. लातूर मधील रसिकाग्रणी माननीय राज्याचे माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दिलीपरावजी देशमुख यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे भव्य आयोजन मागील वर्षीपासून केले जात आहे. या सर विलास संगीत दरबार कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू असून संगीत प्रेमींना विनामूल्य प्रवेश पास रियल हनी शॉप प्रमोद सुपर मार्केटच्या खालील बाजूस नंदी स्टॉप या ठिकाणीं उपलब्ध करून दिले आहेत

या कार्यक्रमाचे उद्घाटन अष्टविनायक प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी यांच्या शुभहस्ते होणार आहे.यावेळी राज्याचे माजी मंत्री लातूरचे लोकप्रिय आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे माजी आमदार जिल्हा बँकेचे चेअरमन धीरजजी देशमुख, खासदार शिवाजीराव काळगे , दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे माजी महापौर दीपक सुळ या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



**स्वरविलास संगीत दरबाराचा सर्वांनी लाभ घ्यावा**

स्वागताध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे आवाहन स्वरविलास संगीत दरबार समारोहासाठी आपण सर्व रसिकांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाचा रसास्वाद घ्यावा, असे आवाहन स्वरविलास संगीत दरबार समारोहाचे स्वागताध्यक्ष राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख,मार्गदर्शक अतुल देऊळगावकर तसेच डॉ.अजित जगताप प्रा.शशिकांत देशमुख, किरण भावठाणकर नियोजन समिती प्रमुख विशाल जाधव, आवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय शहा, सचिव डॉ. रविराज पोरे, डॉ. संदिपान जगदाळे, प्रा. हरिसर्वोत्तम जोशी, डॉ . वृषाली देशमुख,संजय सुवर्णकार, महेश काकनाळे, केशव जोशी,हेमंत रामढवे, दत्ता पाटील, शंभुदेव केंद्रे, सुरेश कुलकर्णी, हरीराम कुलकर्णी, व्यंकटेश पांचाळ, दिनकर पाटील, काकासाहेब सोनटक्के, डॉक्टर भदाडे,डॉ. मंजुषा कुलकर्णी, देवदत्त कुलकर्णी, हे घेत आहेत. व समस्त आवर्तन, अष्टविनायक व मांजरा परीवाराच्या वतीने रसिकांना उपस्तित राहण्याचे आवाहन केले आहे.

# लातूर शहरातील गंजगोलाई परिसरात रविवारी 'लातूर हरितोत्सव'

राज्यात सर्वात कमी वृक्षाच्छादन असलेल्या जिल्ह्यांमध्ये लातूरचा समावेश आहे. त्यामुळे जिल्ह्यात जास्तीत जास्त वृक्ष लागवड होण्यासाठी 'माझं लातूर, हरीत लातूर' मोहीम हाती घेण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत यंदा सलग दुसऱ्या वर्षी लातूर शहरातील गंजगोलाई परिसरात रविवार, १७ ऑगस्ट रोजी 'लातूर हरितोत्सव' या अभिनव उपक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. यानिमित्ताने महात्मा गांधी चौक ते गंजगोलाई दरम्यान वृक्ष दिंडीचे आयोजन होईल. या उपक्रमात जिल्हा प्रशासनासह वृक्षप्रेमी संघटना आणि लातूर व्यापारी महासंघ सहभागी होणार आहे.



'लातूर हरितोत्सव'दरम्यान गंजगोलाई ते हनुमान मंदिर चौक परिसरात खासगी रोपवाटिकांचे स्टॉल्स लावले जातील. यामध्ये औषधी वनस्पती, शोभिवंत झाडे, परसबागेसाठी योग्य रोपे, फळझाडे, फुलझाडे,

### वृक्षारोपणासाठी रोपे, साहित्य एकाच ठिकाणी होणार उपलब्ध !

सेंद्रिय खते, कुंड्या आणि इतर आवश्यक साहित्य सवलतीच्या दरात विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहे.

शहरातील नागरिकांना घराच्या अंगणात, गच्चीवर किंवा गॅलरीमध्ये लावण्यायोग्य झाडांची माहिती दिली जाईल. तसेच, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेताच्या बांधावर लावण्यासाठी योग्य फळझाडांच्या निवडीपासून लागवडीपर्यंत मार्गदर्शन केले जाईल. याशिवाय, महिला बचत गटांचे खाद्यपदार्थ विक्रीचे स्टॉल्सही उभारले जातील. या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या खासगी रोपवाटिकाधारकांनी वृक्ष प्रदर्शन आणि विक्री स्टॉल्सच्या नोंदणीसाठी लातूर कृषी विभागातील योगेश स्वामी (भ्रमणध्वनी क्र. ८४२१५०२९११) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



आधार कार्ड नागरिकत्वाचा पुरावा म्हणून स्वीकारला जाणार नाही- सुप्रीम कोर्ट...




गणरायाच्या आगमनापूर्वी अतिक्रमण व खड्डामुक्त रस्त्याची गरज आहे !
तरच भाविक भक्तांना आनंद होणार आहे !!

# हर घर तिरंगा मोहीम, लातूर मनपाच्या तिरंगा बाईक रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद








**लातूर/प्रतिनिधी:** हर घर तिरंगा मोहीम २०२५ अंतर्गत लातूर शहर महानगरपालिकेतील वाहन विभागाच्या वतीने मंगळवार दि. १२ रोजी तिरंगा बाईक रॅली काढण्यात आली.या रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.महानगरपालिकेचे सर्व कर्मचारी व अधिकारी रॅलीत सहभागी झाले होते.

मनपामार्फत हर घर तिरंगा मोहीम २०२५ अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. तिरंगा बाईक रॅली हा त्याचाच एक भाग होता. प्रतीवर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा या रॅलीचे आयोजन करण्यात आले. नागरिकांमध्ये देशभक्तीपर वातावरण तयार करण्यासाठी तसेच राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी या तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ८ ते १० या कालावधीत ही रॅली संपन्न झाली.

मनपाचे कर्मचारी व अधिकाऱ्यांनी टी शर्ट, टोप्या व तिरंगी झेंडे यासह रॅलीत सहभाग नोंदविला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला मनपा अधिकारी अतिरिक्त आयुक्त व मुख्य लेखाधिकारी यांच्याकडून पुष्पहार घालून रॅलीची सुरूवात करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क ते छत्रपती शिवाजी महाराज चौक,राजीव गांधी चौक परत छत्रपती शिवाजी महाराज चौक, गांधी चौक,गंजगोलाई ते महानगरपालिका कार्यालय या मार्गावरून ही रॅली काढण्यात आली. मनपा कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला हार घालण्यात आला. राष्ट्रगीताने तिरंगा बाईक रॅलीचा समारोप झाला.

या रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी आयुक्त श्रीमती मानसी अतिरिक्त आयुक्त तथा नोडल अधिकारी, देविदास जाधव तसेच उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहन विभाग प्रमुख पवन दगडू सुरवसे यांनी उत्तम नियोजन केले.

या रॅलीमध्ये सहायक आयुक्त नंदकिशोर तपाडिया,स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी बंडू किसवे, संतोष लाडलापुरे,समाधान सुर्यवंशी, भांडारपाल बालाजी शिंदे,विद्युत विभाग प्रमुख जे. एम. ताकपिरे,जनसंपर्क अधिकारी रूक्मानंद वडगावे,अग्निशामक अधिकारी चौधरी,अतिक्रमण विभाग प्रमुख रवि कांबळे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वयंप्रेरणेने सहभाग नोंदवला.

## दिशा प्रतिष्ठानतर्फे २२ विद्यार्थ्यांना तीन लाख शैक्षणिक शुल्काचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी:** चांगले शिक्षण घ्यावे, नामांकित शिक्षण संस्थेतून शिक्षण घेवून आपण निवडलेल्या क्षेत्रात करियर घडवावे असे प्रत्येक विद्यार्थ्याचे आणि त्यांच्या पालकांचे स्वप्न असते. परंतु, अनेकदा बिकट आर्थिक परिस्थिती असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना त्यांचे स्वप्न साकार करण्यात विविध अडचणी येतात. तरी अशा आर्थिकदृष्ट्या हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या २२ विद्यार्थ्यांना लातूरच्या दिशा प्रतिष्ठानकडून शैक्षणिक शुल्कासाठी आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते मान्यवरांच्या हस्ते तब्बल ३ लाख ८०,७२० रुपयांचे धनादेश गरजू २२ विद्यार्थ्यांना देण्यात आले. दिशा प्रतिष्ठानच्या लातूर येथील क्रीडा संकुल परिसरात आयोजित कार्यक्रम ही मदत करण्यात आली. आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. अशोक पोद्दार होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. अभय कदम, डॉ.सुनिता पाटील, डॉ.स्मिता वडे, डॉ. श्रीशैल्य जळकोटे आदींसह दिशा प्रतिष्ठानचे पदाधिकारी सदस्यांची उपस्थिती होती. दिशा प्रतिष्ठान हे मागील ५ वर्षांपासून सामजिक क्षेत्रात विशेष करून गोरगरीब कुटूंबातील, आर्थिकदृष्ट्या बिकट अवस्था असलेल्या कुटुंबातील गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देते. याशिवाय फिरत्या दवाखाना चालवत रुग्णसेवाही दिली जाते. दरम्यान, इयत्ता १० पासून पुढे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना पैसे ही अडचण ठरू नये, शाळा–महाविद्यालयांमध्ये फीस भरली नाही म्हणून त्यांना शिक्षणापासून वंचित राहून नये, हा यामागचा उद्देश आहे. आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण हे केवळ फीस नाही म्हणून शिक्षण थांबते. परंत, अशा विद्यार्थ्यांसाठी दिशा प्रतिष्ठान काम करते. आतापर्यंत ५०० च्या वर विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिला आहे.

